## —: प्रेसनोट दिनांक — ०३/०२/२०२६ :—

**आरोपी लोकसेवक विनोद कृष्णात बामणकर, वय— २९ वर्षे, महसुल सेवक (कोतवाल) सजा कोगील बुद्रुक, रा. कोगील बुद्रुक, ता. करवीर, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत.......**

---

तक्रारदार यांचे आजोबा यांचे नांवे कोगिल बुद्रुक ता.करवीर येथे गट नं. ५३१ क्षेत्र ७ गुंठे ही शेतजमीन आहे. त्यांचे आजोबांनी सदर शेतजमीन तारण देवून गावातील सहकारी संस्थेकडुन तीन महिन्यापुर्वी ५,००,००० रूपये कर्ज मंजूर झाले होते. परंतु सदर कर्जाची रक्कम आंम्हाला देण्यापुर्वी संस्थेचा नियमानुसार आंम्ही तारण म्हणून दिलेल्या वरील मिळकतीचे ७/१२ उता—यावर संस्थेने बोजा नोंद केला होता. परंतु तक्रारदार यांनी वरील प्रमाणे संस्थेकडुन मंजुर झालेले कर्ज घेण्याचेपुर्वीच त्यांनी शासनाचे एका महामंडळाकडुन ३,००,०००/— रूपये कर्ज मंजूर करून घेतले. त्यामुळे तक्रारदार यांनी गावातील संस्थेकडून मागणी केलेल्या कर्जाची रक्कम न घेण्याचे ठरविले त्यानंतर त्यांनी त्यांचे वरील गट नं.५३१ मधील ७/१२ उता—यावर गावातील संस्थेचा बोजा नोंद झाला होता. सदरचा बोजा कमी करण्याकरीता संस्थेने तक्रारदार यांचेकडे महसुल अधिकारी, कोगिल बुद्रुक ता.करवीर यांचे नांवे पत्र दिले होते. सदरचे पत्र घेवुन तक्रारदार महसुल अधिकारी यांचे कार्यालयामध्ये गेले होते, त्यावेळी तेथे तक्रारदार यांना कोतवाल विनोद बामणकर हे भेटले. त्यावेळी तक्रारदार यांनी कोतवाल बामणकर यांचेकडे संस्थेच पत्र दिले मिळकतीवरील बोजा कमी करणेचा असल्याचे सांगितले. त्यावेळी कोतवाल बामणकर यांनी बोजा कमी करण्यासाठी १००० रू.खर्च आहे तो आणून दया त्यानंतर ७/१२ उता—यावरील बोजा कमी करून देतो असे म्हणाले कोतवाल बामणकर यांनी तक्रारदार यांचेकडे १,०००/— रूपये लाचेची मागणी केली म्हणुन तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये तक्रारदार यांना कोतवाल विनोद बामणकर यांनी तक्रारदार यांचे ७/१२ उता—यावर गावातील संस्थेचा बोजा नोंद झाला आहे तो कमी करून देतो अये म्हणुन तक्रारदार यांच्याकडे १,०००/— रूपयांची बेकायदेशिरपणे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता, पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी आरोपी लोकसेवक विनोद कृष्णात बामणकर, महसुल सेवक (कोतवाल) सजा कोगील बुद्रुक यांनी १,०००/— रूपये लाच स्विकारलेने, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी आरोपी लोकसेवक विनोद कृष्णात बामणकर, वय— २९ वर्षे, महसुल सेवक (कोतवाल) सजा कोगील बुद्रुक, रा. कोगील बुद्रुक, ता. करवीर, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच वैष्णवी पाटील पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर यांचे मार्गदर्शनाखाली उज्वला भडकमकर पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ. सुधिर पाटील, पो.कॉ. कृष्णा पाटील, पो.कॉ. संदिप पवार अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :— १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :— ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी कमांक — ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:— १०६४.